**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०५ / २०११.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : २३/११/२०११.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.............................................

सदस्य / सदस्या,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची आज होणारी सर्वसाधारण सभा क्र.५ बुधवार दिनांक २३ / ११ / २०११ रोजी दुपारी १.०० वाजताची सभा अहमदनगर नगरपालिकेचे माजी नगराध्यक्ष नवनीतभाई बार्शीकर यांचे निघन झालेने तहकुब करण्यात येवुन गुरूवार दिनांक २४/११/२०११ रोजी दुपारी १.०० वा. अहमदनगर महानगरपालिका माळीवाडा येथील जुने महानगरपालिका सभागृहात सभा क्रमांक ५ चे विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

प्र. नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सविनय सादर.
प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सविनय सादर.
प्रत : मा.उपमहापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सविनय सादर.
प्रत : मा.सभापती, स्थायी समिती, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव.
प्रत : मा.सभागृह नेता, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव.
प्रत : मा.सभापती, म.बा.क.समिती, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव.
प्रत : मा.उपसभापती, म.बा.क.समिती, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव.
प्रत : मा.विरोधी पक्ष नेता, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव.
प्रत : मा. उपायुक्त (सा.), अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव.
प्रत : मा.उपायुक्त (कर) अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव.
प्रत : मा सहाय्यक आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस्तव.
प्रत : महानगरपालिका हवालदार, यांस नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणेसाठी.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०५ / २०११.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १५ / ११ /२०११.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०५ , बुधवार दिनांक २३/११/२०११.**

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती.............................................

सदस्य / सदस्या,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक २३ / ११ / २०११ रोजी दुपारी १.०० वाजता** माळीवाडा येथील जुने महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. मागील सभा क्र.४ दि.२२/०८/२०११ रोजीचे इतिवृत्त.
३. प्रस्तावाची टिप्पणी.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक ०५ बुधवार दिनांक २३ / ११ /२०११ रोजी दुपारी १-०० वाजता होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

---*---

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| १२ | मागील सभा क्रमांक ४ दिनांक २२/०८/२०११ रोजीचे सभांचे इतिवृत्त कायम करणे. |
| १३ | दुखवट्याचा प्रस्ताव. |
| १४ | महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान ( जिल्हा स्तर ) अंतर्गत अनुदान मिळणेबाबत मा.जिल्हा नियोजन समिती कडेस प्रस्ताव पाठविणे बाबत. |
| १५ | राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या आकृतीबंधात " अतिरिक्त आयुक्त " या पदाचा समावेश करणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| १६ | अहमदनगर महानगरपालिके मार्फत महाराष्ट्र राज्य मैदानी स्पर्धा आयोजन करीता **"महापौर चषक"** अंतर्गत असणा-या तरतुद मधुन रक्कम रु.२,००,०००/- चे निधी देणेबाबतचा कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| १७ | नागरी दलित वस्ती योजना सन २०१०-२०११ अंतर्गत सक्कर चौक ते रेल्वे स्टेशन दरम्यान सीना नदीवरील लोखंडी पुलाशेजारी पुल बांधणेसाठी व कंन्सल्टंटसाठी निविदा बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| १८ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : १५/११/२०११.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १२** **दिनांक : २४/११/२०११**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** मागील सभा क्रमांक ४ दिनांक २२/०८/२०११ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-** मागील सभा क्रमांक ४ दिनांक २२/०८/२०११ रोजीच्या सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.महानगरपालिका सभेपुढे ठेविले.

--**--

**चर्चा :**- नाही.

**ठराव :-** मागील इतिवृत्त कायम करणेस ही सभा मंजुरी देत आहे. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सुचक : मा.श्री.दिलीप नानाभाउ सातपुते

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

ठराव सर्वानुमताने मंजूर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १३** **दिनांक : २४ /११ /२०११**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - --

**प्रस्तावाचा विषय :** दुखवट्याचा प्रस्ताव.

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | शेकापचे ज्येष्ठ नेते ॲड.दत्तात्रय नारायण तथा दत्ता पाटील यांचे शनिवार दिनांक २७/०८/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | कै.इंदिराबाई सिध्देश्वर धर्माधिकारी यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | कै.सुनंदा रामदास पुरंदरे यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | कै.विमल रामकृष्ण इंगळे यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ५ | कै.दत्तात्रय आनंदराव निंबाळकर यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | कै.कान्होजी लोंढे यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव |
| ७ | भारतातील लोकप्रिय हिंदी व उर्दु भाषेतील गझ़ल सम्राट कै.जगजितसिंग यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | सर्वांगसुंदर रचनांनी उभ्या महाराष्ट्राला संमोहित करणारे संगीतकार श्रीनिवास खळे यांचे शुक्रवार दिनांक २/०९/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ९ | महाराष्ट्रातील नामवंत मल्ल व कुस्ती मैदानातील भीष्माचार्य रुस्तुम-ए-हिंद व महाराष्ट्राचे क्रीडा संघटक हरिश्चंद्र उर्फ मामा माधवराव बिराजदार यांचे गुरुवार दिनांक १५/०९/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १० | भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार मन्सूर अली खान उर्फ पतौडी यांचे गुरुवार दिनांक २२/०९/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ११ | कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री वसंत साठे यांचे शुक्रवार दिनांक २३/०९/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १२ | केशव भानुदास कर्डिले यांचे सोमवार दिनांक २६/०९/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १३ | भारतीय सैन्य दलातील वीरचक्र पुरस्कार विजेते निवृत्त कै.श्रीकात नागेशराव धर्माधिकारी यांचे मंगळवार दिनांक २७/०९/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १४ | श्रीनिवास चिप्पा यांचे सोमवार दिनांक १२/०९/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १५ | प्रसिध्द छायाचित्रकार गौतम राजाध्यक्ष यांचे मंगळवार दिनांक १३/०९/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १६ | शंकरराव रंगय्या छिंदम यांचे गुरुवार दिनांक १३/१०/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

| | |
|---|---|
| १७ | अहमदनगर शहरातील प्रसिध्द डॉक्टर पोपटलाल भंडारी यांचे रविवार दिनांक १६/१०/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १८ | पुणे येथील ज्येष्ठ पशुवैद्यक डॉ.दिवाकर शंकर गो-हे यांचे शनिवार दिनांक २९/१०/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| १९ | मुंबई येथील सुप्रसिध्द उद्योगपती अरविंद मफतलाल यांचे रविवार दिनांक ३०/१०/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २० | अकोला येथील जितेंद्र पिचड यांचे सोमवार दिनांक ३१/१०/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २१ | अहमदनगर शहरातील हमाल मापाडी मंडळाचे प्रदेश उपाध्यक्ष आप्पासाहेब कोरपे यांचे गुरुवार दिनांक ०३/११/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २२ | ज्येष्ठ गायक व संगीतकार डॉ.भूपेन हजारिका यांचे शनिवार दिनांक ०५/११/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २३ | औरंगाबाद येथील प्रसिध्द प्लास्टीक सर्जरी करणारे नामवंत डॉक्टर शरदकुमार दीक्षित यांचे मंगळवार दिनांक १५/११/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २४ | दैनिक सकाळ वृत्त समुहाचे संपादक व ज्येष्ठ पत्रकार वा.दा.रानडे यांचे मंगळवार दिनांक १५/११/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २५ | हिंदी चित्रपट व्यवसायातील प्रसिध्द ज्येष्ठ नृत्य दिग्दर्शक सुबल सरकार यांचे शनिवारी दिनांक १२/११/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २६ | ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी, समाजवादी नेते आणि मा.खासदार बापूसाहेब काळदाते यांचे बुधवार दिनांक १६/११/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २७ | श्रीमती इंदुमती रघुनाथ लिमये यांचे बुधवार दिनांक १६/११/२०११ रोजी दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २८ | भालचंद्र वैद्य यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २९ | झुंबरलाल नेमीचंद बोरा यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३० | गंगुबाई निवृत्ती राउत यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३१ | शामशेठ बिहाणी यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३२ | वीणा विष्णु नवलानी यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३३ | मर्चंट बँकेचे माजी चेअरमन विजय मुथ्था यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३४ | मुथ्था योगेश (सराफ) यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३५ | कान्हुजीराव लोंढे यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३६ | दत्तात्रय निंबाळकर यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३७ | अंबादास कोतकर यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३८ | लवंगाबाई शिंगी यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

| | |
|---|---|
| ३९ | संतोष संपतलाल भंडारी यांचे सटाणा पिंपळगाव रोड मार्गावर झालेल्या अपघातात झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४० | निकेत संतोष भंडारी यांचे सटाणा पिंपळगाव रोड मार्गावर झालेल्या अपघातात झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४१ | भिकचंद सुखलाल गादीया यांचे सटाणा पिंपळगाव रोड मार्गावर झालेल्या अपघातात झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४२ | धरमचंद प्रतापचंद लुणावत यांचे सटाणा पिंपळगाव रोड मार्गावर झालेल्या अपघातात झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४३ | हर्षद कांतीलाल बलदोटा यांचे सटाणा पिंपळगाव रोड मार्गावर झालेल्या अपघातात झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४४ | अहमदनगर शहराचे माजी आमदार व अहमदनगर नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष नवनीतभाई बार्शिकर यांचे दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

**ठराव :-** दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १४** **दिनांक : २४/११ /२०११**

---

**प्रस्तावाचा विषय :** सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" अंतर्गत अनुदान मिळणेबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करून निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ १] शासन निर्णय क्रमांक- अशस १४०७/३६०/प्र.क्र.२११/नवि-२० दि. ३१/०८/२००९.

२] शासन निर्णय क्रमांक-अशस-२०१०/प्र.क्र.१९९/नवि-२० दि.०१/०१/२०११

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये मुख्य अग्निशमन अधिकारी यांजकडुन विनंती रिपोर्ट सादर करणेत येतो की, अग्निशमन सेवेतील तुट भरु न काढणेकरीता व अग्निशमन सेवेचे सक्षमीकरण करणे करीता विविध आवश्यक उपाययोजनांच्या दृष्टीने संदर्भीय क्र.१ अन्वयेच्या शासन निर्णयाव्दारे महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियानामध्ये अहमदनगर महानगरपालिका सहभागी झालेली आहे. सदर अभियानांतर्गत नागरी भागात अग्निशमन सेवेशी निगडीत पायाभुत सुविधांचे बळकटीकरण करणेसाठी अग्निशमन केंद्र बांधणे, अग्निशमन वाहने तसेच अग्निशमनासाठी पुरक उपकरणे खरेदी करणे इत्यादी बाबीन्वये संदर्भीय शासन परिपत्रक क्रमांक २ नुसार " महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) अंतर्गत अनुदान मिळणेबाबतच्या प्रकल्प प्रस्तावांना मा.जिल्हाधिकारी हे प्रशासकीय मंजुरी प्रदान करणार आहेत.

सबब संदर्भीय शासन परिपत्रकानुसार मा.जिल्हा नियोजन समितीकडेस अशाद जा.नं.४११४ दिनांक १८/०३/२०११ अन्वये आपत्ती प्रवण क्षेत्रामध्ये पुरक उपकरणे खरेदी करणेकामी व हद्दवाढ क्षेत्राच्या प्रारुप विकास योजनेमधील विविध भागामध्ये प्रस्तावित करणेत आलेल्या आरक्षणान्वये अग्निशमन केंद्र व सेवा निवासस्थाने बांधण्यासाठी आवश्यक जागेचा भुसंपादनाचा खर्च भागविण्याकरीता येणा-या अपेक्षित खर्चासह एकुण रक्कम रु १,१५,७५,०००/- (अक्षरी रक्कम रु एक कोटी पंधरा लक्ष पंच्च्याहत्तर हजार मात्र) चा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

परंतु मा.जिल्हा नियोजन समिती, अहमदनगर कार्यालयाकडे दिनांक २४/०३/२०११ रोजी समक्ष पाठपुरावा केला असता सन २०१०-२०११ या वर्षामध्ये निधी शिल्लक नसल्याने सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेचे मंजूरीने आगामी सन २०११-२०१२ या वर्षात पाठविणे बाबत निर्देश देणेत आलेले आहेत.

सबब सदरचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे ठेवणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे सदरचा विषय मा.महासभेपुढे निर्णयार्थ घेणेबाबत मान्यतेस सादर.

यावर मा.आयुक्त साो यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

चर्चा :-

**मा.बाळासाहेब बोराटे :-** माजी नगराध्यक्ष नवनीतभाई बार्शिकर यांचे आज दुःखद निधन झाले आहे. त्यांचे दुःखद निधनानिमित्त आजची सभा तहकुब करण्यांत यावी व उद्या दुपारी १.०० वाजता सभा बोलाविण्यांत यावी अशी मागणी करतो.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** बाळासाहेब बोराटे यांनी जी सूचना मांडली त्यास मी अनुमोदन देतो.

**मा.महापौर :-** अहमदनगर शहराचे शिल्पकार नवनीतभाई बार्शीकर यांचे निधनानिमित्त आजची सभा तहकूब करण्यांत येत असून उद्या दिनांक २४/११/२०११ रोजी दुपारी १.०० वाजता सभा सुरु होईल.

दिनांक २४/११/२०११ तहकूब सभा पून्हा सुरु.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** नवनीतभाई बार्शीकर यांचे तैलचित्र महानगरपालिका कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यांत यावे.

**मा.सौ.मालन ढोणे :-** अनुमोदन.

**मा.श्री.संजय चोपडा :-** नवनीतभाई बार्शीकर हे माझ्या वॉर्डातील मतदार होते त्यांचे कार्य सदैव नगरकरांच्या स्मरणात राहील त्यांचे तैलचित्र महानगरपालिकेतर्फे लावण्यात यावे तसेच अर्बन बँक चौक येथे त्यांचे बराचकाळ वास्तव्य असल्याने त्या चौकास बार्शीकर चौक असे नामकरण करण्यात यावे. तसेच महानगरपालिकेच्या नविन सभागृहास त्यांचे नाव देणे बाबत ठराव घेण्यात यावा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** संजय चोपडा यांनी जी सूचना मांडली त्यास मी अनुमोदन देतो यानंतर दुखवट्याचे प्रस्ताव यादीचे वाचन करण्यांत यावे.

मा.श्री.संजय चोपडा व बाळासाहेब बोराटे यांनी मा.आयुक्त यांना निवेदन सादर केले.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** यापूर्वी आम्ही वेळोवेळी यादी देवूनही आजच्या सभेत प्रश्नोत्तराचा तास घेण्यात आलेला नाही. पाहणी अहवाला बाबत आम्ही प्रश्नोत्तराचे तासात आम्ही चर्चा करणार होतो पण प्रश्नोत्तराचा तासच आजच्या सभेत घेण्यांत आलेला नाही. तरी नगरसचिव यांनी याबाबत खुलासा करावा.

**नगरसचिव :-** मा.सदस्यांनी दिलेले याद्या संबंधीत विभागाकडे पाठविण्यांत आलेल्या आहेत. परंतु त्यांचेकडून वेळेत उत्तरे प्राप्त न झाल्याने प्रश्नोततरे घेता आली नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** शासनाचे कुठलेही निर्देश नाहीत तसेच महानगरपालिका जनरल बोर्डाची मंजूरी पाहणी अहवालासाठी नाही तरीही पाहणी अहवालाची प्रक्रीया सुरु आहे काम पूर्ण झाल्यावर पाहणी करा व बोगस आढळल्यास संबंधितांवर कारवाई करा व आजपासून पाहणी अहवाल रद्द करा.

**मा.महापौर :-** सर्व सभागृहाच्या भावना लक्षात घेता पाहणी अहवाल आजपासून रद्द करण्यांत येत आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** बुरुडगांव भागातील एक महिला २००४ पासून प्रभाग समितीमध्ये चकरा मारीत आहे परंतु तिला दाद देत नाही तिच्या रो-हौसिंगच्या घराला भाडेकरी नुसार आकारणी करण्यांत आली आहे. ती स्वतः त्या घरात राहते मी समक्ष काल प्रभाग समिती मध्ये जावून संबंधितांना याची विचारणा केली व याबाबत मी सर्वसाधारण सभेत प्रश्न उपस्थित करणार असे सांगितले असता त्याचदिवशी बील दुरुस्त करुन तिला बील देण्यात आले. याचा अर्थ सर्वसामान्य नागरिकांनी कितीही पाठपुरावा केला तरी कामे मार्गी लागत नाही या संदर्भात सखोल चौकशी होवून कारवाई बाबत मी पत्र देत आहे.

**मा.आयुक्त :-** संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** वसुली विभागात मनमानी कारभार चालू आहे. संबंधित कर्मचा-यास पैसे दिले नाही तर त्यांचे मनाप्रमाणे घरपट्टीची आकारणी करण्यात येते उपनगरात नविन बांधकामावर ब-याच ठिकाणी आकारणी झालेली नाही. व पालिकेचे उत्पन्न बुडत आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** मेडीकल प्रतिपूर्तीचे बील अदा करण्याला किती दिवस लागतात. एक प्रकरण २९/१०/२०११ पासून पडून आहे ऑडीट विभागाकडील गमरे मॅडम यांचेकडे प्रलंबित आहे. अजून त्यांनी तपासून दिलेले नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** महानगरपालिकेकडील गफूर वायरमन ऑन ड्युटी इलेक्ट्रीक पोलवरुन पडला सध्या हॉस्पीटलमध्ये ॲडमीट आहे त्याला ट्रीटमेंटसाठी रक्कमेची आवश्यकता आहे. बील अदा न केल्यास त्याला दवाखान्याची ट्रीटमेंट घेता येणार नाही. युनियनने एक दिवसाचा पगार देणेबाबत पत्र दिले आहे. पण मुख्यलेखाधिकारी यांनी भविष्यात ऑडीट पॉईंट येवू शकतो या कारणामुळे दोन लाख रुपयांचा चेक काढला पूर्ण चेक काढला नाही. त्याचा पूर्ण रक्कमेचा चेक ताबडतोब देण्यांत यावा.

**मा.श्री.शेख नजीर अहमद :-** प्रभागातील कर्मचारी कामे करीत नाही. आयुक्त साहेब यांनी स्वत: फिरुन पाहणी करुन संबंधितांवर कारवाई करा नवनीतभाई सारखे काम करणारा आज कोणीही नाही.

**मा.आयुक्त :-** वायरमन यांस दोन लाख रुपये दिले आहेत. प्रॉव्हीडंड फंडातून ५० हजार रुपये दिले आहेत. पगार झाल्यानंतर ५ लाख रुपये अदा करण्यांत येतील.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** उपनगरात नवीन बांधकाम झालयानंतर ताबडतोब आकारणी होणे आवश्यक आहे. पण पाच वर्ष बील दिले जात नाही. ५ वर्षानंतर संबंधितांस कशा पध्दतीने घरपट्टीची आकारणी करणार.

**मा.आयुक्त :-** नवीन आकारणी करतांना मालमत्ता राहू नये यासाठी जी.आय.एस. च्या माध्यमातून सर्व्हे करुन संपूर्ण मालमत्तांना टॅक्स कसा लागेल याचा विचार चालू आहे. कायद्यातील तरतूदीनुसार मागील ३ वर्षापर्यंत आकारणी करता येते.

**मा.सौ.संगिता खरमाळे :-** माजी सैनिकांना यापूर्वी सर्व्हेचे काम देण्यात आले होते त्यांनी भरपूर चूका केल्या नळ कनेक्शन नसतांना नळ कनेक्शन दाखविले आहेत. अद्यापही या चुका सुधारणा होत नाही.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** सावेडी उपनगरामध्ये अनेक नळ कनेक्शन बोगस आहेत. नागरीकांनी नळ कनेक्शनसाठी अर्ज केले ५००/- रुपये डिपॉझिट भरले आहेत. महानगरपालिके मार्फत पुढे कार्यवाही झाली नाही. दरम्यानचे काळत नागरिकांनी कनेक्शन घेतले व अधिका-यांनी पाहणी करुन बोगस ठरवले. कार्यालय सहकार्य करीत नसेल तर नागरिकांनी काय करायचे.

**मा.आयुक्त :-** नळ कनेक्शन मंजूरी साठीची प्रकरणे प्रलंबित राहतात त्याला अनेक कारणे आहेत. टॅक्स भरलेला नसतो. ५०० रुपयांची पावती केली असेल व संपूर्ण टॅक्स भरला असेल तर ताबडतोब नळ कनेक्शन द्यावयास पाहिजे.

**मा.श्री.किशोर डागवाले :-** आपलेच कर्मचारी नळ कनेक्शन देतात त्यांच्या बदल्या करा. मागे एका फिटरची बदली केली त्याला इतकी वृत्तपत्रात प्रसिध्दी दिली गेली एकाच ठिकाणी कर्मचारी जास्त दिवस राहील्यास त्याचे लागेबांधे निर्माण होतात.

**मा.आयुक्त :-** यावर विचार करण्यांत येईल. नविन आकारणी बाबत संबंधित प्रभाग अधिका-यांची जबाबदारी निश्चीत करुन कारवाई करण्यांत येईल.

**मा.श्री.निखील वारे :-** दिल्लीगेट रस्ता चांगला केल्याबद्दल सर्वांचे आभार मानतो. महानगरपालिके मार्फत अधिकारी वाहने वापरतात त्यांना वाहनांची खरोखरच आवश्यकता आहे किंवा नाही. याची चौकशी करुन अहवाल देवू याबाबत मागील सभेत आश्वासन देण्यात आले परंतू अद्याप काहीच कार्यवाही झालेली दिसत नाही.

**मा.आयुक्त :-** चौकशी अद्याप झालेली नाही या वाहनांचा गैरवापर होतो अथवा ज्यांना वाहनाची आवश्यकता नाही याबाबत चौकशी करुन १५ दिवसात अहवाल सादर करण्यांत येईल.

**मा.श्री.सचिन पारखी :-** एक पदाधिकारी स्वत: टू व्हीलर वापरतो पण त्यांचे वाहनाचे प्रतिपूर्ती बील महानगरपालिकतर्फे अदा केले जाते. शिष्ट मंडळाचे सभापती वाहन न वापरता प्रतिपूर्ती घेतात.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** यापूर्वी वाहनाच्या वापराबाबत पत्र देण्यात आलेले आहे. प्रभाग अधिकारी त्यांच्या खाजगी कामासाठी वाहन वापरतात अधिका-यांना पगारामध्ये पेट्रोल अलौन्स दिला जातो. त्यांनी स्वत:चे वाहन वापरावे महानगरपालिकेकडे रुग्णवाहिका नाही. जेसीबी नाही. शववाहिका नाही त्या खरेदी कराव्यात जेणेकरुन नागरिकांना सुविधा मिळेल. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडील टॅक्टर ट्रॉली चोरीला गेल्याचे समजले.

**मा.श्री.निखील वारे :-** पोलिस प्रशासनाकडून याबाबत सांगण्यात येते की, जी ट्रॉली चोरीला गेली त्याची नोंद महानगरपालिकेकडे नाही.

**मा.आयुक्त :-** रुग्णवाहिका खरेदी बाबत मा.संजय चोपडांशी याबाबत चर्चा झाली महानगरपालिकेचा खर्च करण्याऐवजी काही ट्रस्ट मार्फत मिळाल्यास महानगरपालिका खर्च वाचू शकेल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** अपल्या मालकीचे ९९ वाहने असतांना आरोग्य विभागाकडे कचरा वाहतुकीसाठी खाजगी डंपर भाडयाने घेतले आहेत. महानगरपालिका अधिका-यांची वाहने बंद करा व इतर वाहने खरेदी करा.

**मा.आयुक्त :-** याबाबत चौकशी करुन १५ दिवसात निर्णय घेण्यात येईल.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** ॲम्ब्युलन्स साठी तरतुद बजेट करण्यांत आलेली असतांनाही का घेतली जात नाही. केडगांव, सावेडी परिसरातील नागरिकांसाठी शववाहिनीची अत्यंत आवश्यकता आहे. मा.महापौर यांनी त्वरीत निर्णय घ्यावा.

**मा.श्री.संजय चोपडा :-** महानगरपालिका कर्मचारी पदोन्नतीसाठी उपोषणाचा मार्ग अवलंबतात तरी पदोन्नतीसाठी उपोषणाची वेळ कर्मचा-यांवर येवू नये यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**मा.आयुक्त :-** श्री.कोंडा यांनी ज्या पदासाठी पदोन्नतीची मागणी केली आहे. त्या पदासाठी ते लायक नाही. जंम्पींग प्रमोशन देता येत नाही. ज्या पदासाठी तो कर्मचारी पात्र आहे त्यास त्यानुसार पदोन्नती देण्यांत येईल.

**मा.श्री.बाळासाहेब पवार :-** प्रभाग समिती क्रमांक १ सावेडी परिसरातून महानगरपालिकेला जास्त घरपट्टी भरणा येतो असे असतांनाही या प्रभाग समिती कडील इलेक्ट्रीक बांधकाम उद्यान विभागाकडे कर्मचा-यांची कमतरता आहे. याबाबत आढावा घेण्यांत यावा तेथील मस्टर कर्मचारी श्री.धीरडे यांचेकडे विचारणा केली असता त्यांचे नेहमी उत्तर दोनच कर्मचारी आहेत. असे असेल मग इतर कर्मचारी कुठे गेले याचा शोध घ्यावा.

**मा.आयुक्त :-** कर्मचारी त्या ठिकाणी नसतात ही बाब बरोबर आहे. उपायुक्त यांना कर्मचा-यां बाबत आढावा घेण्यास सांगीतले आहे एक आठवडयात याबाबत आढावा घेण्यांत येईल. प्रभाग समितीस जेवढे कर्मचारी आवश्यक आहेत त्यानुसार कार्यवाही करण्यांत येईल.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** केडगांव पाणीपुरवठा योजना व शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ संदर्भात वृत्तपत्रात बातमी मा.आयुक्तांवर अविश्वास ठराव आणणार याबाबत खुलासा करावा. या योजनेचे काम केंव्हापासून व कशामुळे बंद आहे. काम बंद असतांना उद्‌घाटन केले किंवा नाही याचा आधी खुलासा करावा सत्ताधा-यांवर यावर आक्षेप घेण्यांत येतात.

**मा.श्री.संजय गाडे :-** दिनांक १९/०३/२०११ रोजी रेल्वेस्टेशन ते सक्कर चौक दरम्यानचे रस्त्यावर मा.लोकप्रतिनिधी चक्कर मारतो काम बंद पडले. सिना नदी सुशोभिकरण काम का बंद पडले.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** मा.मुख्यमंत्र्यांची दिशाभुल करुन उद्‌घाटन करण्यांत आले. टाक्या पूर्ण नसतांना उद्‌घाटन कसे केले याचा खुलासा करावा संबंधितांवर कारवाई करा पाईप चोरी प्रकरणाची सीबीआय चौकशी करा.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** ज्या ठेकेदाराला काम दिले त्याला दमदाटी करण्यांत आली याची चौकशी करावी.

**मा.आयुक्त :-** अविश्वास ठरावाबाबत वृत्तपत्रातील बातमीचा खुलासा करणार नाही. केडगांव पाणी पुरवठा योजनेतील पहिला टप्पा ९०% काम पूर्ण झाले आहे. मुळच्या १४ कोटीच्या हिश्यापैकी ७ कोटी चे अनुदान अद्यापपर्यंत शासनाकडून प्राप्त झालेले नाही. त्यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. टाक्याचे कामाबाबत लवकर कसे सुरु होतील याचे प्रयत्न सुरु आहेत. उद्‌घाटनापुर्वी महानगरपालिकेतर्फे स्पष्टपणे कळविण्यांत आले आहे. कामाचा अहवाल स्पष्टपणे दिलेला आहे. मेकॅनिकल इंजिनियर कामाबाबत सद्यपरिस्थिती सांगतील.

**मेकॅनिकल इंजिनियर :-** ७२ किलो मीटर पैकी २४ किलो मीटर काम पूर्ण झाले आहे. ५ टाक्यापैंकी ४ टाक्यांची कामे प्रगतीपथावर असून २ टाक्यांची कामे चालू केली नाही. ठेकेदारास काम सुरु करणेबाबत वेळोवेळी पत्र देण्यात आले आहेत. यापैकी उड्डाणपुला जवळील टाकीचे काम नुकतेच चालू केलेले आहे. एकनाथनगर टाकीचे काम चालू आहे. ओंकारनगर येथील काम लवकर सुरु करण्यांत येईल.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** कॉक्रींटी करणाचे कामावर डांबरीकरण करण्यांत आले आहे असे करता येते का. नगरमध्ये हा नवीनच प्रकार पहावयास मिळाला आहे. याबाबत खुलासा करावा.

**श्री.मगर, शहरअभियंता :-** कॉक्रींट या अर्धा इंच थर खराब झाला होता त्यावर डांबरीकरण करण्यांत आले. डांबरीकरण करु शकतो.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** केलेले काम किती दिवस टिकणार सर्व काम चूकीच्या पध्दतीने चालू आहे काम किती दिवस टिकणार याची मला लेखी गॅरंटी देण्यात यावी.

**श्री.मगर शहर अभियंता :-** सिलकोट सारखा थर दिला आहे. संबंधित ठेकेदारांकडून २ वषा्रची लेखी गॅरंटी घेण्यांत येईल झालेल्या कामाचे कुठलेही बील ठेकेदारास दिलेले नाही. कॉक्रींटचे संपूर्ण काम खराब झाले असेल तर त्यावर डांबरीकरण करता येणार नाही. पण सीलकोट खराब झाले तर करण्यास हरकत नाही.

**मा.श्री.विनीत पाअुलबुधे :-** दिल्लीगेट ते पत्रकार चौक कामाबाबत आपले इंजिनियर खोटी माहिती देतात काम करायला ते पात्र आहेत की नाही याची चौकशी करा झालेल्या कामाची पुन्हा एकदा चौकशी करा याबाबत रुलिंग द्या.

**मा.महापौर :-** याबाबत चौकशी केली जाईल पुढच्या सभेमध्ये याचा रिपोर्ट सादर करण्यांत येईल.

**मा.श्री.संजय गाडे :-** नॅशनल सिक्युरिटी गार्डचे सुरक्षारक्षक नेमणूकीचे ७५ लाख असतांना ६९ लाख रुपयांचे त्यांचे नावावर चेक काढण्यात आले. टीडीएसचे ३ लाख ७८ हजार रुपयांचे चेक काढण्यात आले याबाबत सविस्तर पत्र वाचून दाखवतो. तसेच झालेल्या पेमेंट बद्दल माहिती देतो. सदर झालेल्या गैरव्यवहारास कोण जबाबदार आहे. त्याची चौकशी करुन संबंधितांवर कारवाई करावी.

**मा.आयुक्त :-** याबाबत चौकशी करण्यात येईल असे होवू नये याबाबत दक्षता घेण्यात येईल व १५ दिवसात चौकशी करुन संबंधितांची जबाबदारी निश्चीत करण्यांत येईल.

**मा.श्री.निखिल वारे :-** टीडीआर मधुन येणा-या पाण्याचा प्रवाह सावेडी भागात ओढयात अतिक्रमण करुन संपूर्ण आढा बुजवला आहे. सर्व्हे नंबर ८७ मध्ये कवीजंग नगर मध्ये खाजगी ठेकेदाराने बांधकाम केले सदर ठिकाणी मा.आयुक्त यांनी भेट देवून पाहणी केली पण पुढे कार्यवाही झालेली नाही.

**मा.आयुक्त :-** यापूर्वी ज्या तक्रारी प्राप्त झाल्या त्यावर कार्यवाही केलेली आहे. मिस्कीन मळया जवळील ओढया बाबत कारवाई केलेली आहे. याबाबत कारवाई करण्यांत येईल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ज्या खात्याचा प्रश्न चर्चेला येतो त्या प्रश्नाचे उत्तरे मा.आयुक्त साहेब देत आहेत. परंतु संबंधित अधिकारी उपस्थित नाहीत.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** महानगरपालिकेचे वकील या ठिकाणी उपस्थित नाही जे अधिकारी उपस्थित नाहीत त्यांनी सभेचा अवमान केलेला आहे. सभेचा अजेंडा त्यांना देण्यात आलेला आहे. सभा तहकूब करावी.

**मा.महापौर :-** संबंधितांवर कारवाई करण्यांत येईल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** शोकॉज काढण्याची गरज नाही. कारवाई करा. महापौरांच्या परवानगीने मा.आयुक्त यांनी उत्तर द्यावे संबंधितांना अजेंडा पोहोचलेला आहे.

**मा.श्री.निखिल वारे :-** अनुपस्थित अधिका-यांची यादी जाहीर करा.

**मा.आयुक्त :-** मागील स्थायी समितीच्या बैठकीस अनुपस्थित असणा-या अधिका-यांना कारणे दाखवा नोटीस देण्यांत आली आहे. आजच्या सभेला गैरहजर असणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यांत येईल.

**मा.श्री.निखिल वारे :-** नैसर्गिक ओढे संबंधित प्लॉट धारकाने बंद केले त्यामुळे पाणी पुढे यायला मार्ग नाही. परिणामी उपनगरामध्ये लोकांच्या घरामध्ये पाणी शिरुन मालमत्तेची हानी होत आहे.

**मा.आयुक्त :-** तांबटकर मळ्यातील जागा खाजगी जागा आहे. तांबटकर यांचेशी जागा महानगरपालिकेस देणे संदर्भात चर्चा केली आहे. जोपर्यंत खाजगी जागा मालक जागा देत नाही तोपर्यंत कार्यवाही करु शकत नाही. तरीही मार्ग काढण्याच्या दृष्टीने प्रयत्न करतो आहोत.

**मा.श्री.संग्राम जगताप :-** निखिल वारे यांनी जो प्रश्न मांडला तो अगदी योग्य आहे आपण त्यावर ठोस कारवाई करा.

**मा.आयुक्त :-** या प्रश्ना संदर्भात उपायुक्त नगररचनाकार व संबंधित जागा मालक यांची एक आठवडयात बैठक घेवून निर्णय घेण्यात येईल.

**मा.श्री.संजय चोपडा :-** सदर विषयाबाबत अनुदान प्राप्तीसाठी ४ महिन्यांचा कालावधी शिल्लक आहे. या विषयाचा पाठपुरावा करण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नेमण्यांत यावा. विषय मंजूर करावा.

**मा.श्री.शिवाजी लोंढे :-** इलेक्ट्रीक विभागाकडील कर्मचारी पोलवरुन पडून गंभीर जखमी असून सध्या हॉस्पीटलात आहे. त्याला पैशांची अत्यंत आवश्यकता आहे. तरी त्याला ५ लाख रुपये देण्यांत यावे तसेच कर्मचा-यांचा विमा उतरविण्यांत यावा. केडगांव अग्नीशमन विभागाची इमारत बांधून तीन वर्ष झाले परंतु सध्या तिचा वापर होत नाही. केडगांव फायर स्टेशनसाठी एक गाडी व दोन ड्रायव्हर दिलयास केडगांव भोवतालच्या परिसरात आगीच्या दुर्घटनासाठी वापर होवू शकतो. केडगांवसाठी पाणीपुरवठा विभाग चालू करण्यांत यावा. नविन इमारतींना अग्नीशमन विभागाने ना-हरकत प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. आपल्या महानगरपालिकेस हा नियम लागू नाही काय याबाबत खुलासा करा.

**श्री.मिसाळ फायर फायटर सुपरिंटेंडेंट :-** नगर शहरामध्ये नविन इमारतींना ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ नुसार प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. नगररचना विभागाशी या संदर्भात पत्रव्यवहार झालेला आहे.

**मा.आयुक्त :-** प्रत्येक झोनला किती कर्मचारी लागतात किती फायर स्टेशन आवश्यक आहेत याबाबत नविन आकृती बंधामध्ये समावेश करण्यांत आलेला आहे.

**श्री.मिसाळ फायर फायटर सुपरिंटेंडेंट :-** कर्मचारी जर उपलब्ध झालेतर फायर स्टेशन सुरु करता येईल. अग्नीशमन विभागाकडील वाहने सुस्थितीत आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** बुरुडगांव महानगरपालिका हद्दीतुन वगळण्यांत आले आहे. त्यांचे ग्रामपंचायतीचे रेकॉर्डची मागणी वारंवार करण्यांत येते परंतु आपले कर्मचारी याबाबत कोणतीही कार्यवाही करीत नाही तरी त्यांना ताबडतोब महानगरपालिकेकडील रेकॉर्ड उपलब्ध करुन देण्यांत यावे.

**मा.श्री.विनीत पाऊलबुधे :-** नुकतेच मा.कृषीमंत्री शरदराव पवार यांचेवर भ्याड हल्ला झाल्याचे समजले. या हल्याचा आम्ही निषेध करतो व पुढील धोरण ठरविणेसाठी आम्ही सभा त्याग करतो.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** विषय मंजूर करावा.

--**--

**<u>ठराव :-</u>**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षामध्ये जिल्हा नियोजन विकास समितीमार्फत "महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान" अंतर्गत अनुदान मिळणेबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावास मंजूरी देण्यात येत आहे. अनुदान मिळणेकामी सदरच्या ठरावासह संपूर्ण प्रकरण जिल्हा नियोजन विकास समितीकडे पाठविण्यांत यावे.

सुचक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

अनुमोदक : मा.श्री.संजय फुलचंद चोपडा

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १५** **दिनांक : २४ /११ /२०११**

---

**प्रस्तावाचा विषय :** राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या आकृतीबंधात " अतिरिक्त आयुक्त " या पदाचा समावेश करणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**फेरसादर** - मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, मुंबई यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : एमसीओ १२११/प्र.क्र.१४/नवि-१४ दिनांक २८ मार्च, २०११ अन्वये परिपत्रक देवुन "ड" वर्ग महानगरपालिकांसाठी "अतिरिक्त आयुक्त " हे पद आकृतीबंधामध्ये समाविष्ट करण्यांत येत आहे. याप्रमाणे नमुद करुन अहमदनगर महानगरपालिकांसाठी अवरसचिव समकक्ष दर्जाचे १ पद मंजुर केले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे प्रारुप सेवाप्रवेश नियम / आकृतीबंध तयार करण्यांत येवुन मा.प्रधान सचिव (२) नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडेस अंतीम मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करण्यांत आलेला आहे. सदर आकृतीबंधामध्ये " अतिरिक्त आयुक्त " या पदनामाचे पद प्रस्तावित करणेत आलेले नाही. तथापि उपरोक्त शासन निर्णय विचारात घेवुन अहमदनगर महानगरपालिकेच्या प्रारुप आकृतीबंधामध्ये " अतिरिक्त आयुक्त " या पदनामाचे पद प्रस्तावित करणे उचित व आवश्यक वाटल्याने अहमदनगर महानगरपालिकेचे प्रारुत आकृतीबंध / सेवा प्रवेश नियमामध्ये " अतिरिक्त आयुक्त " १ पद समाविष्ट करण्यास व सदरचा प्रस्ताव मा.शासनाच्या मंजुरीसाठी पाठविणे करीता मा.आयुक्त यांचे मान्यतेने सदरचा विषय मा.महासभेची मंजुरीस्तव नगरसचिव विभागाकडे सादर करणेत आला.

मा.महासभा प्रस्ताव क्रमांक : ६ : दिनांक २२/०८/२०११ अन्वये सदरच्या विषयावर मा.महासभेमध्ये चर्चा होवुन खालील प्रमाणे ठराव पारीत झालेला आहे.

ठराव :- अहमदनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता विषय स्थगित ठेवणेत यावा. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

अतिरिक्त आयुक्त या पदावर प्रनिनियुक्तीने नेमणुक केल्यास त्यांचे वेतनावर दरमहा अंदाजे रु.४०,०००/- ते रु.५०,०००/- (वार्षिक अंदाजे रु. ५ ते ६ लाख ) इतका खर्च अपेक्षित आहे. अहमदनगर महानगरपालिका अर्थसंकल्प सन २०११-२०१२ मध्ये प्रतिनियुक्ती खर्च - वेतन व भत्ते या लेखाशिर्षाखाली सन २०११-२०१२ करीता रु.२९,३९,०००/- इतकी तरतुद केलेली आहे.

तरी येणेप्रमाणे अवलोकनार्थ व आदेशार्थ सविनय सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, शासन निर्णय दिनांक २८/३/११ मधील मुद्दा क्रमांक २ नुसार महानगरपालिकेकडील केंद्र / राज्य शासनाच्या योजनांची अंमलबजावणी व इतर कामकाजासंदर्भात अतिरिक्त आयुक्त दर्जाचा वरिष्ठ अधिकारी अत्यावश्यक असल्याने पदनिर्मिती केल्याने होणा-या खर्चाची तरतुद प्रस्तावितप्रमाणे सन २०११-२०१२ साठी रु.२९,३९,०००/- उपलब्ध असल्याने पदनिर्मितीसंदर्भात महासभेपुढे येणेप्रमाणे अहवाल ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त सो, यांचा अभिप्राय की, पुन्हा मा.महासभेपुढे पाठवा.

**चर्चा :-**

**मा.सौ.मालन ढोणे :-** नगरविकास खात्याकडे सादर केला आहे. महानगरपालिकेवर बोजा टाकण्यासाठी अतिरिक्त आयुक्त पद निर्मिती के ली आहे. महानगरपालिकेला सध्या किती टक्के आस्थापनावर खर्च होतो पदनिर्मिती केल्यास त्यांचेसाठी कार्यालय, शिपाई, ड्रायव्हर व इतर खर्च होणार आहे. ज्यावेळी महानगरपालिकेचे उत्पन्न वाढेल त्यावेळी वर्ग-१ चे पद निर्माण करावे अतिरिक्त आयुक्त

पदाऐवजी वॉलमनची पदे मंजूर करावी. आडतेबाजार, दाळमंडई  रस्ता रुंदीकरण ५० फूटाऐवजी ४० फूट करण्यात यावा तसेच ज्यांच्या जागा या रस्ता रुंदीकरणात जाणार आहेत याबाबत महानगरपालिकेचे काय धोरण आहे ते सादर करावे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** या विषयाबाबत ठराव करतांना सदर पदाचे वेतन शासनाने अदा करावे असा करण्यांत यावा महानगरपालिकेवर कोणताही भार नको आपण कोणतीही जबाबदारी घेवू नका.

**मा.श्री.संजय चोपडा :-** सदर पदाचे शासन निर्णयात किती लोकसंख्येला हे पद लागु आहे याचा उल्लेख नाही. आपली महानगरपालिका लहान आहे. या पदाचा खर्च महानगरपालिकेस पेलवणार नाही. महानगरपालिकेस नगररचनाकार शहरअभियंता व इतर पदांची आवश्यकता असतांना ती अद्याप पावेतो भरण्यांत आलेली नाही. १० इंजिनियर आवश्यक असतांना त्यापैकी ४ इंजिनियर अद्यापही भरले नाही याचा खुलासा करा.

**मा.आयुक्त :-** सदरचा विषय पद निर्माण करण्याचा आहे. किमान १ अतिरिक्त आयुक्त पद निर्माण केलेले आहे. शासन निर्णयाच्या अनुषंगाने हा विषय पाठविण्यांत आला परंतू मध्यंतरी कायद्यात दुरुस्ती झाली आहे. त्यामुळे ठराव घेण्याची सुध्दा आवश्यकता नाही.

**मा.श्री.सचिन पारखी :-** देवरा साहेब जिल्हाधिकारी यांनी महानगरपालिका स्थापनेनंतर महानगरपालिकेस कोणकोणते अधिकारी आवश्यक आहेत याची सूची शासनाकडे सादर केलेली आहे. अधिकारी बदलले की पुन्हा नविन प्रस्ताव तयार होतो. आरोगय अधिकारी पद हे प्रतिनियुक्तीने भरण्यांत यावे. तीन वर्ष हे पद प्रतिनियुक्तीने मागविण्यांत यावे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** लाईट बिलावर जाहीराती प्रमाणे घरपट्टीचे बिलावर जाहीरात छापण्यात यावी जेणेकरुन पालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल. (लाईट बील सभागृहास दाखविले)

**मा.श्री.गणेश कवडे :-** विकास कामाचे जे प्रस्ताव आहेत त्या प्रस्तावावर ऑडीट विभागाकडील श्री.बाबर हे तपासून देण्यास टाळाटाळ करतात ठराविक फाईलला विलंब लावतात बाबर यांनी याबाबत सभागृहास खुलासा करावा.

**श्री.बाबर :-** माझेकडे एकही विकास कामांची फाईल पेंडींग नाही. मा.महापौर यांनी रजिष्टर मध्ये नोंद झाल्याशिवाय त्यावर कारवाई करु नये. अशा सूचना दिलेलया आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** बांधकाम विभागाकडे सध्या लिपीकांची कमतरता आहे. सात वॉर्डला लिपीक नाही वॉर्ड नंबर ४८,६०,४४,४५ यामध्ये मा.महापौर यांचे वॉर्डलाही लिपीक नाही तरी लिपीक देण्याबाबत कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** निर्मलनगर फेज-२ पाण्याचे टाकीचे काम अभय मुथ्था कॉन्ट्रॅक्टर करतात असे समजते सब कॉन्ट्रॅक्टर म्हणून ते काम करतात उद्या जर कामात काही धोका झाला तर जबाबदार कोण धरणार.

**मेकॅनिकल इंजिनियर :-** कामाचे क्वालिटी बाबत कोणताही धोका पत्करला जाणार नाही. तापीने यांनी कुणाला काम द्यावयाचे हा त्यांचा विषय आहे.

**मा.श्री.बाबासाहेब वाकळे :-** ह्या विषयावर बरीच चर्चा झाली पुढील विषय घेणेत यावा.

--**--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर मात्र या पदाकरीता मा.शासनाकडुन आस्थापना खर्चावर अनुदान मिळणेकामी मा.शासनास विनंती करणेत यावी. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.बाळासाहेब चंद्रशेखर मारुती बोराटे

अनुमोदक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १६** **दिनांक : २४ /११ /२०११**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिके मार्फत महाराष्ट्र राज्य मैदानी स्पर्धा आयोजन करीता **"महापौर चषक"** अंतर्गत असणा-या तरतुद मधुन रक्कम रु.२,००,०००/- चे निधी देणेबाबतचा कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

अहमदनगर जिल्हा ॲथेलेटिक्स असोसिएशन यांचेवतीने मा.आयुक्त साहेब यांचे नांवे महाराष्ट्र राज्य मैदानी स्पर्धेकरीता महापौर निधी अंतर्गत निधी उपलब्ध करुन देणे बाबत प्रस्ताव दिलेला आहे. सोबत सदर स्पर्धेचे एकुण रक्कम रुपये ३१,४०,०००/- अंदाजपत्रक जोडलेले आहे. सदरचा प्रस्ताव मा.महापौर साहेब यांचेकडे पाठविणे बाबत निर्देश मा.आयुक्त साहेब यांनी दिले आहेत.

तद्नंतर मा.महापौर साहेब यांनी दिनांक ०७/१०/२०११ रोजी यादी देवुन सुचित केलेले आहे की, जिल्हा ॲथेलेटिक्स असोसिएशन अ.नगर यांचे खर्चाचे अंदाजपत्रकापैकी ट्रॉफी / मोनेन्टो / सर्टिफिकेट देणेकामी महानगरपालिकेने रक्कम रुपये २,००,०००/- (रुपये दोन लाख फक्त) अंशदान देणे बाबत कार्यवाही करावी. सदर संस्थेस ट्रॉफी / मोनेन्टो / सर्टिफिकेट खेळाडूंना कॅप व बनियन देणेच्या साहित्यासह प्रायोजक अहमदनगर महानगरपालिका व महानगरपालिकेचा लोगो टाकणे बंधनकारक करण्यांत यावे. तसेच २०११-२०१२ चे अर्थ संकल्पातील "महापौर चषक" स्पर्धा भरविणे या लेखाशिर्षा मधुन सदरचा खर्च मंजूर करण्यांत यावा. व त्यांना धनादेश देण्याबाबत व्यवस्था करण्यात यावी असे नमुद केले आहे.

त्या अन्वये सादर की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ महानगरपालिकेस स्वेच्छानिर्णयानुसार तरतूद करता येतील अशा बाबीमधील बाब क्रमांक ११ प्रदर्शने, व्यायामाचे किंवा अन्य खेळाचे सामने भरविणे बाबत असणा-या तरतुदी अन्वये महानगरपालिकेने सन २०११-२०१२ चे अंदाजपत्रकामध्ये क्रीडा व सांस्कृतिक विभाग अंतर्गत " महापौर चषक " खेळांचे सामने भ्रविणे या लेखाशिर्षकाखाली रक्कम रु.१०,००,०००/- मात्रची तरतुद करण्यांत आली असून, सदरची तरतुद पुर्णतः शिल्लक आहे.

प्रतीवर्षी महानगरपालिकेच्या स्वेच्छा निर्णयानुसार " महापौर चषक " अंतर्गत विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन करीत असते. तरी मागणी प्रमाणे विषयांकित स्पर्धा आयोजनासाठी रक्कम रु.२,००,०००/- (रक्कम रुपये दोन लाख फक्त) निधी द्यावयाचे झाल्यास सदरचा निर्णय हा धोरणात्मक स्वरुपाचा असुन, त्यास मा.महासभेची मंजूरी असणे आवश्यक असल्याने सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे पाठविणेस प्रशासकीय मंजूरी मिळणेच्या आदेशार्थ सविनय सादर.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, "अ" नुसार कार्यवाहीस्तव.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, सदरील प्रस्ताव अधिनियमाच्या कलम ६६ (११) अन्वये तरतुद केलेल्या " महापौर चषक " स्पर्धा आयोजनासाठी असुन तद्नुसार भविष्यात स्पर्धा आयोजन

करावयाचे झाल्यास निधी कमतरता भासु शकते. त्यामुळे त्यानुसार या स्पर्धेसाठी प्रायोजकत्व स्विकारुन निधी देणे किंवा " महापौर चषक " स्पर्धा आयोजन करणे याबाबतचा निर्णय मा.महापौर कार्यालयाकडून झाल्यास त्यानुसार मा.महासभेने निर्णय घेणे योग्य होईल. त्यानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साो यांचा अभिप्राय की, "अ" मान्य.

यावर मा.महापौर साो यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे प्रस्ताव ठेवा.

**चर्चा :-** नाही.

--**--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. महापौर चषक या लेखाशिर्षामधुन सदर खर्च भागविणेत यावा. महाराष्ट्र राज्य मैदानी स्पर्धा भरविणे कामी अहमदनगर जिल्हा अॅथेलेंटीक्स असोसिएशन यांना रक्कम रुपये दोन लाख अर्थ सहाय्य देण्यात यावे. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.बाबासाहेब सोन्याबापू वाकळे
अनुमोदक : मा.दिलीप नानाभाउ सातपुते

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : १७** **दिनांक : २४ /११ /२०११.**

---

**प्रस्तावाचा विषय :** नागरी दलित वस्ती योजना सन २०१०-२०११ अंतर्गत सक्कर चौक ते रेल्वे स्टेशन दरम्यान सीना नदीवरील लोखंडी पुलाशेजारी पुल बांधणेसाठी व कंन्सल्टंटसाठी निविदा बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** मा.महापौर साहेब यांचे जा.क्र.पी.ए.२८१ दिनांक १०/०८/२०११ रोजीची यादी.

मा.महापौर सो यांनी इकडेस यादी देवुन सीना नदीवर लोखंडी पुलाशेजारी पुल बांधणे बाबत सुचित केले आहे. सदरचा पुल रेल्वे स्टेशन ते शहरात येणेसाठी व शहरातुन रेल्वे स्टेशनकडे तसेच रस्त्याचे कडेने असणारे दलित वस्तीकडे जाणेसाठी हा एकमेव व महत्वाचा रस्ता असुन यावरुन मोठया प्रमाणात वाहतुक होते.

या ठिकाणी दोन पुल आहेत. पैकी एक पुल ब्रिटीशकालीन बांधलेला लोखंडी पुल असुन सदर पुल जडवाहतुकीस बंध केलेला आहे. यावरुन फक्त दुचाकी वाहने सध्या जात आहेत. दुसरा पुल हा कमी उंचीचा, कमी रुंदीचा दगडी व स्लॅबचा पुल आहे व हा पुल रहदारीस व जड वाहतुकीस अपुरा पडत आहे व भविष्याचा व वाहतुकीचा विचार करता सदर पुल मोठा करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.महापौर संदर्भिय पत्रानुसार काम सुचविलेले आहे.

सदरचे काम कुशल काम असुन यासाठी हायड्रोलिक डिझाईन, पुर पातळी, आर सी सी डीझाईन इत्यादी करणे आवश्यक आहे. सदर काम करणेसाठी महानगरपालिकेच्या पॅनल बोर्ड वर असलेले कन्सल्टंट हे आर्किटेक्ट असल्याने पुल बांधणे संबंधित कंन्सल्टंट नेमणुक केलेली नाही. त्याकरीता ७ दिवसाची निविदा काढुन विषयांकित कामाच्या सर्व्हेक्षण, डिझाईन, अंदाजपत्रक, सुपरव्हिजनच्या कामाकरीता कन्सल्टंट नेमणुक करावी लागेल. तसेच पुलाच्या अस्तित्वातील लांबी व रुंदीनुसार सा.बां.विभाग सन २०१०-२०११ दरसुची नुसार ढोबळ अंदाजपत्रक तयार केले असता अंदाजपत्रकीय रक्कम रु.१२७.५० लक्ष इतकी रक्कम अपेक्षित आहे. सदर कामावरती कन्सल्टंट नेमणुक करणेकरीता अंदाजपत्रकीय दराच्या सुमारे ३.५% म्हणजे ४.४६ लक्ष असे एकुण १३१.९६ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

मा.महापौर यांचे संदर्भीय पत्रान्वये सदर कामाकरीता मा.शासनाचा दलित वस्ती सुधार योजनेतुन प्रस्तावित करणेचे सुचविलेले आहे त्यानुसार सन २०१०-२०११ करीता मा.शासनाचा मा.दलित वस्ती सुधार योजनेकरीता एकूण १००लक्ष निधी प्राप्त झाले असुन सदरचा प्रस्ताव नियोजन विभाग यांचेकडेस प्रशासकीय मान्यतेसाठी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सादर करावयाचे आहे. त्यामुळे सदर काम दलित वस्ती सुधार योजनेतुन घ्यावयाचे असल्यास १३१.९६ लक्ष पैकी रु.१०० लक्ष व्यतिरिक्त रु.३१.९६ लक्ष निधी अतिरिक्त लागणार आहे. सदरचा खर्च महानगरपालिकेच्या सन २०११-२०१२ च्या मागासवर्गिय कल्याणकारी निधीतुन करणे योग्य होईल.

सदर काम मा.शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनेतुन घेण्याकरीता नगररचना विभागाचा अभिप्राय घेवुन उपरोक्त बाबींसाठी कन्सल्टंट नेमणुकीसाठीच्या खर्च मंजुरीसाठी रिपोर्ट सविनय सादर.

लेखाशिर्ष :- प्रकल्प अहवाल तयार करणे सन २०११-२०१२ बजेट रजि.पा.नं.१२३ वर नोंद.

तरतुद :- १,५०,००,०००/-

यापुर्वीचा खर्च :- --

प्रस्तावित खर्च :- ४,४६,०००/-

एकूण खर्च :- ४,४६,०००/-

शिल्लक तरतुद :- १,४५,५४,०००/-

यावर उपशहरअभियंता यांचा अभिप्राय की, अहवालानुसार सदर कामासाठी कन्सल्टंट नेमणूक करणेस्तव मा.नगररचना विभागाचे अभिप्राय घेणेस्तव मान्यतेस्तव सादर.

यावर शहरअभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे सदरचे काम दलित वस्ती सन २०११-२०१२ मधुन सदर काम करणेसाठी मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन कामाचे अंदाजपत्रक, डिझाईन, सुपरव्हिजन करणेसाठी कन्सल्टंटची नेमणूक करणे आवश्यक आहे. मंजुरीस्तव तथा निर्णयास्तव सादर.

यावर नगररचनाकार यांचा अभिप्राय की, यापुर्वी मल्हार चौक ते रेल्वेस्टेशन हा रस्ता दलितवस्ती निधीमधुनच केलेला आहे. सबब सदर रस्त्याला जोडणारा पुल व दलित वस्ती निधीतुन करणेस हरकत नाही.

यावर उपशहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी/मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे पुल बांधणे कामासाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेली कामे करणेसाठी कन्सल्टंट नेमणुक करणे व त्याकामी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यतेस्तव आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, समक्ष चर्चा करा.

यावर कनिष्ठ अभियंता यांचेकडुन फेरप्रस्ताव सादर की, मा.उपायुक्त (सा) यांचेबरोबर दिनांक २२/०९/२०११ रोजी शहरअभियंता, उपशहर अभियंता सोबत झालेल्या समक्ष चर्चेनुसार मा.महापौर यांनी दिलेल्या यादीनुसार सदरचे काम मा.शासनाच्या दलित वस्ती सुधार योजनुतुन प्रस्तावीत करावयाचे आहे. सदर पुलाचे नविन बांधकामा करीता ब्लॉक इंस्टीमेट नुसार ढोबळ रक्कम रु.१२७.५० लक्ष इतक्या रक्कमेची आवश्यकता आहे. परंतु मा.शासनाकडुन १०० लक्ष इतके अनुदाना इतकेस प्रस्ताव सादर करावयाचा आहे. त्यामुळे उर्वरीत निधी महानगरपालिकेच्या मागासवर्गीय कल्याणकारी योजनेतुन प्रस्तावीत करणे संयुक्तीक होईल. तसेच सदरचे काम कुशल असलेने PMC नेमुण काम करुन घ्यावे लागेल. मा.शासनाच्या निर्णयानुसार सदर काम दलित वस्ती मधुन होणेसाठी महासभेची आवश्यकता आहे.

त्याकारणे सीना नदीवरती पुल बांधणेचे कामाचे मा.शासनाच्या दलित वस्ती योजनेतुन घेणेसाठी व PMC नेमणेसाठी निर्णयास्तव मा.महासभेकडे पाठविणेस्तव रिपोर्ट सविनय सादर.

यावर कनिष्ठ अभियंता यांचेकडुन फेरसादर की, मा.महापौर यांचे दिनांक २२/०९/२०११ च्या पत्रानुसार वरील कामासाठी लागणारी उर्वरीत रक्कम सन २०११-२०१२ चे महापौर शहर विकास निधीमधुन खर्च करणेचे सुचित केलेले आहे. तरी वरील कामास व खर्चास मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक असलेने सदरचा रिपोर्ट मा.महासभेकडे पाठविणेस आदेशार्थ स.सादर.

यावर उपशहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.नगररचना विभागाचे अभिप्रायान्वये व अहवालानुसार मा.महासभेकडे निर्णयास्तव सादर करणेस आदेशार्थ सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मा.महासभेच्या मंजुरीस्तव तथा निर्णयास्तव सादर करणे योग्य.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित पुलाचे काम नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत घेणेस तसेच अनुदानापेक्षा जास्तीचा खर्च मागासवर्गीय कल्याणकारी निधी / महापौर शहर विकास निधीतुन घेणेस सदरील कामाकरीता PMC नेमणुक करणेस मान्यतेस्तव मा.महासभेपुढे विषय ठेवणेस मंजुरीस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साो यांची सहमती दर्शक सही असे.

---*---

चर्चा :- नाही.

**<u>ठराव :-</u>**

ऑफिस रिपोर्ट या सभेने पाहिला असता सादर केलेल्या प्रस्तावातील कामास व खर्चास ही सभा मान्यता देत आहे. तसेच या कामाकरीता PMC ची नेमणुक करणेसाठी देखील मान्यता देण्यात येत आहे. तद्नुषंगिक खर्च मंजूर. तसेच मंजूर मा.शासनाच्या निधी पेक्षा जास्त होणारा खर्च मा.महापौर शहर विकास निधीमधुन करणेस ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.वाकळे बाबासाहेब सोन्याबापु.
अनुमोदक : मा.श्री.शेंडगे संजय छगन.

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.